# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग

किनारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
प्रशासकीय इमारत, ३रा मजला,
चेतना महाविदयालयाजवळ,
वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.

**अनुक्रमांक ५ - नागरिकांची सनद**

**सन २०१८**

# सुची


| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावना | १ - ८ |
| २. | किनारी अभियंता मंडळ कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ८-९ |
| ३. | किनारी अभियंता मंडळ कार्यालयाची रचना | १०-१२ |
| ४. | मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्र | १३-१३ |
| ५. | मंडळांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता | १३-१४ |
| ६ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांकडुन सूचना | १४-१६ |
| ७. | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १६-१६ |
| ८. | परिशिष्टे | १७-१९ |

## १. <u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुख्य अभियंता,(वि.प्र.) सा.बां.विभाग,मुंबई प्रादेशिक विभागांतर्गत किनारी अभियंता, मुंबई हे मंडळ कार्यालय मागील **२७** वर्षापासुन यशस्वीपणे कार्यरत आहे. पूर्वी हे मंडळ कार्यालय गृह विभाग यांच्या अधिपत्याखाली कार्यरत होते. दि.०१/०४/१९८९ पासून सा.बां.विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत मंडळ कार्यालय प्रशासकीय इमारत (३रा माळा), बांद्रा (पूर्व), मुंबई येथे कार्यरत आहे. मुंबई व कोकण किनारपटटीचे संरक्षण व मत्स्यबांधवांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. मच्छिमार बांधवांना मुलभूत सोयी सुविधा देणेचे उद्दीष्ट आहे. ही बांधिलकी किनारी अभियंता मंडळ कार्यालय, मुंबई या सनदेव्दारे जाहीर करत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शित केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूर्तीपर्वूक सोडवावेत हा दृष्टीकोण विचारात घेऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यांत आली आहे.

किनारी अभियंता,सा.बां. मंडळ,वांद्रे(पूर्व),मुंबई या कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक व संकेतांक स्थळ खालील प्रमाणे आहे.

दुरध्वनी क्र.: ०२२ – २६४०४६६४

०२२ – २६५१३८३५

संकेतांक स्थळ :- **www.mahapwd.com**

मेल आयडी :- **coastalmumbai.se@mahapwd.com**

हे मंडळ कार्यालय नागरिकाना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे.

१. गृहविभागाच्या उपलब्ध निधितून महाराष्ट्राच्या समुद्र किनारपटटीचे धुपप्रतिबंधक बंधारे बांधून संरक्षण करण्याची कामे दि.३१/०३/२०११ पूर्वी करण्यात येत होती. शासन निर्णय क्रमांक पीएलएन १२०९/ प्र.क्र.२४९/बंदरे-२,मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२, दि.२६ ऑक्टोबर, २०१० महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे मार्फत करणेत येत आहे. सद्यःस्थितीत शासन निर्णय क्र.एम.आय.एफ.०२१५/प्र.क्र.६४/बंदरे-२,दि.२१ मे २०१५ अन्वये सदर कामे पुनश्चः सा.बां.विभागाकडे

हस्तांतरीत करणेत आली आहे. व आता ही योजना या कार्यालयामार्फत कार्यान्वयीत करण्यात येत आहे.

२. मच्छिमार जेटटी, बंदरे बांधणे व इतर सुविधा उपलब्ध करुन देणे बाबतची प्रगतीत असलेली कामे या कार्यालयामार्फत प्रगतीत आहेत. तथापी आता अश्या स्वरुपाची कामे कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णय क्र.मत्स्यवि-१३१४/प्र.क्र.१३६/पदुम-१४,मंत्रालय, विस्तार मुंबई ४०० ०३२ तारीख १६ ऑगस्ट २०१४ च्या नुसार मत्स्यव्यवसाय विभागामार्फत विविध योजनांतर्गत घेण्यात येणा-या मत्स्यबंदरे व जेटटी विकासाची कामे पूर्ण करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नेमणूक करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. व ही कामे मत्स्यविभागातर्फे केली जातात.

३. राष्ट्रीय चक्रीवादळ प्रकल्पांतर्गत निवारे बांधणेची कामे प्रस्तावित आहेत.

४. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मत्स्य व्यवसाय विभागाची मत्स्यबांधवांसाठी सुविधा पुरविणेची कामे करुन देणे.

५. नागरी अंशदान ठेव योजनेततून इतर विभागाची सागरी किनारपटटीवर संरक्षण विषयक कामे करुन देणे

६. आपत्कालीन स्थितीमध्ये अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे तत्परतेने करणे व मदत करणे.

७. मंडळ कार्यालयाशी संलग्न असलेल्या विभागीय कार्यालयांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

८. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मंडळाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.

९. कार्यालयांच्या कामकाजात सातत्य, आधुनिकता व पारदर्शकता ठेवून मंडळ कार्यालयाची व पर्यायाने सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१०. संगणकीकरणाबाबत हया मंडळांतर्गत विभागीय कार्यालयांना अवगत करणे व ही कार्यालये नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

११. मंडळातील आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे तसेच किनारी अभियंता. सा.बां.विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये केंद्रशासनाच्या माहितीचा अधिकार २००५ मधील मॅन्युअल २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहेत.

१२. सर्व विषयांची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे .

१३. कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेखकक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१४. कामांची अंमलबजावणी करताना क्षेत्रीय अधिकारी हे महाराष्ट्र सा.बां.नियम पुस्तिका, लेखा संहिता, विनिर्देश वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके यांचे काटेकोर पालन करतात.

१५. कर्मचाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती, कर्मचारी नेमणूका, सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे तयार करणे. विविध संवर्गाच्या जेष्ठता यादया तयार करणे इ. कर्तव्ये

विहित स्तरावर अधिकारी प्रदान केलेल्या संबंधीत अधिकाऱ्याकडुन पार पाडल्या जातात.

१६. निविदा विषयीच्या बाबी इ कर्तव्य महाराष्ट्र सा.बां.नियमावली व सा.बां.लेखासंहिता नुसार दिलेल्या अधिकारानुसार विविध अधिकाऱ्याकडुन पार पाडले जातात.

१७. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. किनारी अभियंता मंडळ कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

◆ **किनारी अभियंता मंडळ कार्यालयाची बांधिलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना किनारी अभियंता मंडळ कार्यालय, मुंबई

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल

क) कामकाजामध्ये पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

- **नागरिकांची जबाबदारी :**

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्व असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- नागरिकांनी सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पूरविण्याचा आग्रह धरु नये
- नागरिकांनी स्वेछेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
- नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहाकार्याची भावना ठेवावी

## ३. किनारी अभियंता,सा.बां. मंडळ,बांद्रा(पूर्व),मुंबई कार्यालयाची रचना

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत किनारी अभियंता मंडळ कार्यालय, महाराष्ट्र शासनाने माहे जुलै १९७२ मध्ये स्थापन केले असून हया मंडळांतर्गत एकूण तीन पत्तन अभियंता कार्यालये अनुक्रमे कोकणभवन नवी मुंबई, रत्नागिरी व सिंधुदूर्गनगरी सिंधुदूर्ग येथे कार्यरत आहेत.मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण किनारी अभियंता सा.बां.मंडळ स्तरावर आहे.

किनारी अभियंता मंडळ कार्यालयांतर्गत पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकणभवन, नवी मुंबई, पत्तन अभियंता, पत्तन विभाग रत्नागिरी तसेच पत्तन अभियंता, पत्तन विभाग, सिंधुदूर्ग ही तीन विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. तिन्ही विभागाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहे.

**कोकण भवन,-** मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, ठाणे व पालघर (एकूण ५ उपविभाग कार्यरत आहेत.)

**रत्नागिरी** - संपूर्ण रत्नागिरी जिल्हा (एकूण ४ उपविभाग कार्यरत आहेत. )

**सिंधुदूर्ग** - संपूर्ण सिंधुदूर्ग जिल्हा (एकूण ४ उपविभाग कार्यरत आहेत. )

बंदर व मत्स्यव्यवसाय विभागाकडील अनिवासी व निवासी इमारतीचे व राष्ट्रीय चक्रीवादळे संरक्षक निवारे प्रकल्प-२ अंतर्गत इमारतींचे व जिल्हा नियोजन समिती कामे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतात. सदर तीन पत्तन अभियंतांचे अधिपत्याखाली एकूण १३ सहाय्यक पत्तन अभियंता (उपअभियंता) कार्यरत आहेत.

हया मंडळाचे कार्यक्षेत्र तसेच पत्तन अभियंता व सहाय्यक पत्तन अभियंता कार्यालयांची मुख्यालये दर्शविणारा नकाशा त्याचप्रमाणे हया मंडळांतर्गत कार्यरत कार्यालयांचा वृक्ष - तक्ता (Tree Chart) अनुक्रमे परिशिष्ट ' अ' पृष्ठ क्र. १७ व परिशिष्ट ' ब ' पृष्ठ क्र.१८ म्हणून सोबत जोडले आहेत

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार क्षेत्रातील कार्यकारी अभियंता हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमजबलावणीसाठी सा.बां.नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्याकडुन केले जाते.

## ४. किनारी अभियंता मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्र

हया मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्र मुंबई शहर/ मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्हयात असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण ७२० कि.मी.लांबीच्या सागरी किनारपटटीचा समावेश आहे.

हया मंडळांतर्गत पत्तन अभियंता कार्यालयांकडुन महाराष्ट्र राज्याच्या एकूण ७ जिल्हयात ७२० कि.मी.सागरी किनारपटटीवर मुख्यत्वेकरुन किना-याचे संरक्षणाची कामे केली जातात. तसेच मत्स्यव्यवसाय विभागाकडील लहान मासेमारी बंदराच्या विकासाची राष्ट्रीय चक्रीवादळे संरक्षक निवारे प्रकल्प-२ अंतर्गत निवा-याची व जिल्हा नियोजन समिती ची कामे कार्यान्वीत केली जातात.

त्याचप्रमाणे इतर विभागांकडून ठेव व अंशदान योजनेतून किनाऱ्यांवरील संरक्षण विषय कामे देखील हया मंडळ कार्यालयांतर्गत संबंधीत पत्तन अभियंत्याकडुन केली जातात

## ५. मंडळांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक व माहितीची सुलभता

### अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक

किनारी अभियंता,सा.बां.मंडळ,वांद्रे(पूर्व),मुंबई कार्यालयांतर्गत पत्तन अभियंताकडील कामांची माहिती व

सद्यःस्थिती, अंदाजपत्रक स्तर, निविदा स्तर, प्रत्यक्ष जागेवर सुरु असलेले काम व ते पूर्ण होण्यासाठी अपेक्षित कालावधी इ.संबंधित माहिती पत्तन अभियंता कार्यालयांत मिळू शकेल.

**ब) माहितीची सुलभता**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**६. गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा, व जनसामान्यांकडून सूचना**

**अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण**

हया मंडळाच्या अथवा मंडळांतर्गत विभागीय कार्यालयाच्या कामकाजाबाबत काही तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी, उदाहरणार्थ - सहाय्यक पत्तन अभियंता कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रारी असल्यास पत्तन अभियंता कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे पत्तन अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे/ तक्रार नोंदवावी.

पत्तन अभियंता कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास किनारी अभियंत्याकडे गाऱ्हाणे मांडावे/ तक्रार नोंदवावी. मंडळ कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावी/तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडु न १५ दिवसांत करण्यांत येईल.

गाऱ्हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यांत येत आहे.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा " ई " मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा किनारी अभियंता मार्फत घेण्यांत येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यांत येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते

## ७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत किनारी अभियंता मंडळ कार्यालयाच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १ जानेवारी २०१८ पासुन करण्यास हे कार्यालय कटिबध्द आहे

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यांत येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन सनदेमध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील.

किनारी अभियंता,सा.बां.मंडळ कार्यालय,वांद्रे(पूर्व),मुंबई खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया मंडळाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.


प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यांत येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यांत येईल.

**८. परिशिष्टे**

**अ)** वृक्षतक्ता (Tree Chart)

**ब)** किनारी अभियंता मंडळाची कार्यक्षेत्र दर्शविणारा नकाशा

## परिशिष्ठ ‘अ’


किनारी अभियंता,
सा.बां.विभाग,बांद्रा,मुंबई.
उप अभियंता
अधीक्षक
पत्तन अभियंता,पत्तन अभियांत्रिकी विभाग(ऊ), कोकण भवन, नवी मुंबई.
पत्तन अभियंता,रत्नागिरी पत्तन विभाग,रत्नागिरी.
पत्तन अभियंता,सिंधुदूर्ग पत्तन विभाग,कुडाळ, मु.सिंधुदूर्गनगरी.
स्वीय सहाय्यक (उपअभियंता)
विभागीय लेखापाल
प्रथम लिपीक
स्वीय सहाय्यक (उपअभियंता)
विभागीय लेखापाल
प्रथम लिपीक
स्वीय सहाय्यक (उपअभियंता)
विभागीय लेखापाल
प्रथम लिपीक
सहाय्यक पत्तन अभियंता ,पत्तन उपविभाग, बांद्रा
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, अंधेरी.
सहाय्यक पत्तन अभियंता ,पत्तन उपविभाग, ठाणे
सहाय्यक पत्तन अभियंता ,पत्तन उपविभाग, अलिबाग.
सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, श्रीवर्धन.
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, दापोली
सहाय्यक पत्तन अभियंता ,भगवती बंदर उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता खाण व सर्वेक्षण उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता पाणलोट बंधारा उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, वाघोटण
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, मालवण
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, वेंगुर्ला
सहाय्यक पत्तन अभियंता पत्तन उपविभाग, देवगड

परिशिष्ठ 'ब'

## किनारी अभियंता (सा.बां.) मुंबई मंडळाची कार्यकक्षा दाखविणारा नकाशा

